INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

# नागपुरातील भोसले कालीन जीवन

डॉ. गणेश पी. वानखेडे
इतिहास विभाग
Lak”kks/kd
एन. जे. पटेल महाविद्यालय मोहाडी
जिल्हा भंडारा 44 19 09
Hkze.k/ouh Ø- 9420865059
Email :- gpwankhede@gmail.com

ekxZn”kZd
डॉ. सुरेश एन. काळे
एम ए (इतिहास),
पीएच. डी. (इतिहास)
इतिहास विभाग प्रमुख
प्राध्यापक, o संशोधक
एच बी टी कला व वाणिज्य महाविद्यालय ताजाबाद शरीफ,
उमरेड रोड, नागपूर 24

V- सारांश :-

नागपूरकर भोसल्यांच्या इतिहासात डोकावले असता असे लक्षात येते की, जगाच्या संस्कृतीस सांधण्याचे, जोडण्याचे महत्त्वाचे कार्य नागपुरातील सांस्कृतिक जीवन कार्याने केले आहे. येथील राजे, सरदार व लोक त्यांचे जीवनमान, राहणीमान, पोशाख,धर्म, चालीरीती, सण, उत्सव इत्यादी माध्यमातून सामान्य जनतेला एका सूत्रात कटिबद्ध बांधण्याचे महान कार्य या संस्कृतीने केले.

अशा महान संस्कृतीस राज्याच्या, देशाच्या व जगाच्या इतिहासात तोड नाही.

C- बीज शब्द

1) नागपूर :- भारतातील महत्त्वपूर्ण व अत्यंत ऐतिहासिक साक्ष, पुरावा, राजकीय घडामोडी असलेले, अनेक नररत्नांची खाण असलेले राज्य म्हणजे 'महाराष्ट्र' राज्य होय. अनेक किल्ल्यांचे स्थान या राज्यात सापडते तेवढे कोणत्याच राज्यात सापडत नाही जेवढ्या लेण्या, शिल्प या राज्यात सापडतात तेवढ्या दुसऱ्या राज्यात शोधूनही

Received: 05-02-2026 | Accepted: 12-03-2026 | Published: 19-03-2026 | www.ijeml.com

सापडत नाही असे हे 'महाराष्ट्र' राज्य. या राज्याच्या नावातच महान असे राष्ट्र, विद्वानांचे राष्ट्र, पंडितांचे राष्ट्र,शूरवीरांचे राष्ट्र, महारांचे राष्ट्र अशा अनेक अर्थाने 'महाराष्ट्र' शब्दाचा अर्थ सांगितला जातो.

अश्या थोर राज्याचा पूर्व भाग म्हणजे 'विदर्भ' होय. विदर्भालाच 'वऱ्हाड' म्हणतात. वऱ्हाड म्हणजे सोन्याची कुऱ्हाड. वऱ्हाड म्हणजे या प्रांताची राजधानी, राजधानी नागपूर होय.

नागपूर हे नगर नाग नदीकाठी वसलेले असल्यामुळे 'नागपूर' नाव पडले असावे असे विल्स म्हणतो. नाग जातीवरून या शहरास नागपूर नाव प्राप्त झाले असाही एक मतप्रवाह आहे. नाग नदीमध्ये दगड उचलता क्षणी साप निघत असे त्याला नाग संबोधले जाई. नाग जाती अनार्य असून त्यांचे वंशज आसाम व अंदमानात आहेत. कुशाणानंतर बुंदेलखंडात आरशीव हे नाग राजे झाले. पुढे त्यांनी वाकाटकासोबत स्नेह निर्माण केला आजच्या मध्यप्रदेशातील होशंगाबाद जिल्हयातील पंचमढीजवळ 14 मैल अंतरावर 'नागद्वार' यात्रेचे ठिकाण आहे. नागपूर, नंदीवर्धन, नागवर्धन इत्यादी नावावरून ही गावे नागवंशीय राजांनी इसवी सन 80 ते 175 या काळात वस्ती केली असे प्रसिद्ध संशोधक डॉक्टर जयस्वाल यांचे मत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, नागवंशीय लोकांनी या परिसरात वास्तव्य केल्याने या नगरीस 'नागपूर' नाव पडले व नदीस नाग नदी नाव पडले.

नागपूर नगरी भारताच्या मध्यस्थानी असलेली एक सुंदर, हिरवीगार व महत्त्वाची, ऐतिहासिक नगरी आहे

नागपूर नाव कसे पडले?

गोंड राजे बख्त बुलंद शहाने नागपूरची निर्मिती इ.स. 1702 मध्ये केली. तेव्हा या भागात बारा खेडी अस्तित्वात होती. राजापूर, रायपूर, हिवरी, हरिपूर, वाठोडे, लेंढरा, सक्करदरा, आकरी, फुटाळा, गाडगे, भानखेडा व सीताबर्डी. या खेड्यांना राजापूर बारसा म्हणत बारसा म्हणजे बाराशिवा याचा अपभ्रश होय.

2) भोसले कालीन नागपूर :- नागपूरवर विविध काळात विविध राजकीय लोकांचे वास्तव्य होते. भोसले काळात ही या प्रांताची राजधानी होती. ब्रिटिश काळात येथे मध्यप्रांताची राजधानी निर्माण करण्यात आली होती. मात्र भोसले कालीन

लोक, संस्कृती समाज जीवन प्रथा इत्यादी घटकांचा वापर समाविष्ट करण्यात येतो.

मराठ्यांच्या इतिहासात भोसले वंशाचे स्थान महत्त्वाचे आहे या वंशाच्या दोन शाखा होत्या. एक शिवाजी महाराजांची व दुसरी नागपूरकर भोसल्यांची. पहिल्या शाखेने मालोजी, शहाजी व शिवाजी सारखे कर्तबगार पुरुष निर्माण झाले तर दुसऱ्या शाखेने नागपुरात राज्य स्थापन केले.

नागपूरकर भोसले व वेरूळचे भोसले यांच्यात कुळाबद्दल संशय नाही दोघांच्या वंशावळी व पूर्वज एकच. नागपूरकर भोसल्यांच्या वंशावळीप्रमाणे मुधोजी मूळ पुरुष होय. मुधोजी व त्याचा भाऊ रूपाजी यांच्या पूर्वजांनी पुणे जिल्ह्यातील बेरडी हे गाव शेती करण्यासाठी संपादन केले होते. मुधोजी व रुपाजी हे बांधव शिपाईगिरी करीत. ते शहाजीचे समकालीन होते. मुधोजीपुत्र बापूजी, परसोजी व साबाजी शिवाजीकाळात शिपाईगीरी करीत होते. छत्रपती शिवाजीने आपल्या राज्याभिषेकानंतर साबजी बिन मुधोजी यास राक्षसवाडी व पिंपरी गावे इनाम दिली होती त्यांना एकनिष्ठ सेवक म्हणून संबोधले होते. परसोजीने शिव काळापासूनच वऱ्हाड व गोंडवाना प्रांतात स्वाऱ्या करून मराठ्यांचा अंमल प्रस्थापित केला होता

3) जीवन:- समाज जीवनाचा आढावा घेताना भोसले कालिन तेथील प्रजा, जनता, राजे, महाराजे यांच्या जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या जीवनाचा परामर्श घेतला जाईल तत्कालीन सामाजिक कार्य अनुभव कर्तव्य व जबाबदाऱ्या इत्यादी बाबींचा भोसले कालीन आढावा घेतला जाईल

d- विषय परिचय :-

भारतीय संस्कृती ही देशाच्या इतिहासामुळे, भूगोलामुळे आणि जनतेतील वैविध्यामुळे आकारास आली आहे तसेच महाराष्ट्रीयन संस्कृतीसुद्धा सर्व जाती, धर्मामुळे विविधतेत एकतेच्या सूत्रात सूत्रबद्ध झाली आहे

नागपूरच्या इतिहासात भोसले वंशाचे स्थान अतिशय महत्त्वाचे भोसल्यांनी इसवी सन 1730 ते 1853 पर्यंत नागपूरवर आपले राज्य प्रस्थापित केले होते.

भोसलेकालीन सांस्कृतिक जीवनात तत्कालीन सामाजिक जीवन, वाङ्मय, चालीरीती, भाषा, बोलीभाषा, कला, वर्तमानपत्रे, पूजास्थाने इत्यादी सर्व गोष्टींचा समावेश होतो.

विद्वान मंडळी :- जानोजीच्या काळात( इसवी सन 1755 ते 1772 ) देवाजी पुरुषोत्तम चोरघडे मुख्य दिवाण होते त्यांचा जन्म नरखेडचा. देवाजीपंत एकनिष्ठ सेवक होते. नागपूरच्या सावकाराच्या पाठिंब्यामुळे ते नागपूरचे अनभिसिक्त राजाच होते. त्यांनी पेशवा, निजाम व ईस्ट इंडिया कंप...

दानधर्म:- मधुजी भोसले ब्राह्मणांना दानधर्म करीत. नऊ ऑक्टोबर 1787 रोजी भाद्रपदात आद्य रघुजी महाराजांचे वर्षश्राद्ध व गाईची पूजा रामटेकला करण्याचे ठरले होते. कणा नदीस पूर असल्याने व नावांची सोय नसल्यामुळे मुधोजी भोसले यांनी नागपुरातच ब्राह्मणांना दान दिले 25 मोहरा दान केल्या.

मनोरंजनाची साधने :- या काळात प्राण्यांची झुंज लावणे हे सर्वाधिक लोकप्रिय मनोरंजनाचे साधन होते. कथा, कीर्तने, दंडारी, कुस्त्यांचे फड, शंकरपट, तमाशे, देवांचे उत्सव, यात्रा इत्यादी करमणुकीची साधने होती.

प्राण्यांची झुंज:- भोसले काळात प्राण्यांची झुंज सर्वाधिक महत्त्वाचे करमणुकीच साधन होते. कोंबडा, बोकड, वाघ व हत्ती यांच्या झुंजी बघावयास मिळत . 26 ऑक्टोबर 1787 रोजी नजरबागेत गोंड राजा बुऱ्हान शहा व भोसल्यांनी प्राण्यांची झुंज बघितली.

शिकार :- शिकार हा कोणत्याही राजाच्या प्रतिष्ठेचा विषय अ...

वर्षातून अनेक प्रसंगी आतषबाजी केली जाई. दिवाळीत सुंदर रोषणाई केली जाई. वसंत पंचमीस तेलंखेडी उद्यानात रोषणाई केली जाई.

पाहुण्यांचे स्वागत :- भोसले राजांच्या काळात आदरातिथ्य ठासून भरले होते. हैदराबादच्या निजामाचा विश्वासू सलाबत खानास मार्च 1788 मध्ये आणण्यासाठी दुसरे रघुजी शहरा बाहेर पाच मैल अंतरावर सोनेगावच्या बागेत गेले होते.

नागपुरी संस्कृती :- भोसलेकालीन नागपूर विविध वैशिष्ट्यामुळे प्रसिद्ध आहे जीवती, नागपंचमी, रक्षाबंधन, पोळा, मार्बत,गणेशोत्सव, मस्कऱ्या गणपती, विजयादशमी, दीपावली, मकर संक्रांति होळी इत्यादी सणांचा समावेश होतो.

भोसलेकालीन मंदिर :- बालाजी मंदिर इतवारी, कल्याणेश्वर मंदिर सक्करदरा, चिंतेश्वर मंदिर महाल, वेनूगोपाल मंदिर महाल, मुरलीधर मंदिर सोनेगाव, लक्ष्मीनारायण मंदिर महाल रघुराजेश्वर शिवमंदिर इत्यादी मंदिरे भोसले काळात निर्माण झाली.

भोसलेकालीन शैक्षणिक कार्य :- मदरसा, गुरुकुल इत्यादी प्रकारच्या शैक्षणिक स्थळातून ज्ञानदान केले जाई. पंतोजी शाळेतून ज्ञान दिले जाई. 1820 मध्ये 46 सार्वजनिक शाळा होत्या व 102 शिक्षक होते.

## M- उद्दिष्टे :-

1) नागपूरचा ऐतिहासिक आढावा घेणे.

2) नागपूरच्या भोसलेकालीन जीवनाचा आढावा घेणे.

3) नागपूरच्या सांस्कृतिक जीवनाचा आढावा घेणे.

**b-** संशोधन पद्धती:- प्रस्तुत संशोधनात प्रस्थापित ज्ञानात भर टाकणे किंवा अज्ञात माहितीचा शोध घेणे हा आहे त्याचप्रमाणे जुन्या माहितीचे परीक्षण करून त्याची नव्याने मांडणी करणे हा संशोधनाचा हेतू आहे त्यासाठी विविध पद्धती आहेत प्रस्तुत संशोधनासाठी ग्रंथालयातील ग्रंथ वाचन पद्धतीचा वापर केला आहे. विशेष करून संशोधनासाठी प्राथमिक आणि दुय्यम साधने विश्लेषणासाठी वापरली गेली आहेत. याशिवाय संशोधन, अहवाल, शोधनिबंध, जनरल आणि विविध पुस्तकांमधून स्वरूपाची माहिती गोळा करण्यात आली.

## bZ- संदर्भ xzaFk सूची :-

1) डॉ. कोठेकर शांता (संपा.) डॉ. अंधारे भा.रा., नागपूर नगरी त्रीशताब्दी इतिहास ग्रंथ

(इ.स. 1702-2002)

2) डॉ. अंधारे भा.रा.,

भोसलेकालीन नागपूर, विश्वभारती प्रकाशन, नागपूर 2001

3) डॉ. काळे या. मा., नागपूरकर भोसले यांचा इतिहास

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत ग्रंथ.

4) डॉ. लांडगे दे. गो., नागपूरचा सांस्कृतिक इतिहास.

5) डॉ. सरदेसाई, पेशवे दप्तर .

6) Shejwalkar T. S., Nagpur Affairs